# महाराष्ट्र शासन
# आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई
## शेतकरी समुपदेशन आरोग्य सेवा कार्यक्रम अंतर्गत,
## ''प्रकल्प प्रेरणा''
## कंत्राटी तत्त्वावर रिक्त पदे भरणे बाबत
## थेट मुलाखत जिल्हा रूग्णालय हिंगोली.

राज्यातील मराठवाडा विभागातील नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत शेतकऱ्यांच्या आत्महत्या विचारात घेऊन हिंगोली जिल्हा रूग्णालय स्तरावर कंत्राटी पद्धतीने खालील पदे भरण्यासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. पदाचे नाव, संख्या, शैक्षणिक पात्रता व अर्हता यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | वय | अनुभव | मासिक एकत्रीत मानधन | एकूण भरावयाची पदे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | समुपदेशन तज्ञ (प्रोग्राम ऑफिसर) | एम.बी.बी.एस.,एम.डी./डी.पी.एम. (मनोविकृती शास्त्र) किंवा समतुल्य अर्हता धारक | ६५ वर्षापर्यंत | अनुभवास प्राधान्य | ७०,०००/- | ०१ (एक) |
| २ | समुपदेशन सामाजिक कार्यकर्ता | सामाजिक कार्यकर्ता या विषयात पदव्युत्तर पदवी आणि मनोविकृती शास्त्र या विषयात विशेषज्ञता. | ५० वर्षापर्यंत | अनुभवास प्राधान्य | ३०,०००/- | ०१ (एक) |

**अटी व शर्ती**

१) वरील पदांची नियुक्ती ही पूर्णपणे कंत्राटी स्वरूपाची ११ (अकरा) महिनेकरीताच राहील. सदर पदे पूर्णतः कंत्राटी असल्यामुळे या पदांवर नियमित असल्याबाबतचा कोणताही हक्क राहणार नाही. तसेच या पदांसाठी शासनाने सेवा नियम लागू राहणार नाहीत.

२) वरील पद हे थेट मुलाखतीद्वारे (Walk-in interview) भरावयाची आहेत. या पदासाठीचा अर्ज हा साध्या कागदावर करावा. अर्जात स्वतःचे नाव, वडिलाचे/पतीचे नाव, जन्मतारीख, पत्ता, ईमेल आयडी, दुरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक, शैक्षणिक पात्रता, पदाला अनुसरून असलेला अनुभव दाखला व इतर माहिती भरून त्यावर स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवून सर्व प्रमाणपत्रांच्या साक्षांकित व मुळ प्रतीसह थेट मुलाखतीच्या (Walk-in interview) दिवशी हिंगोली जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रूग्णालय हिंगोली यांच्या कार्यालय येथे सकाळी १०.०० वाजता उपस्थित राहावे.

**थेट मुलाखत : दि.०४/०९/२०१८, वार-मंगळवार, वेळ-सकाळी १०.०० वाजता**

**मुलाखतीचे स्थळ : जिल्हा शल्य चिकित्सक यांचे कार्यालय, जिल्हा रूग्णालय, हिंगोली.**

३) अर्जदार हा संबंधीत पदासाठी शारीरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम असावा तसेच, अर्जदारा विरूद्ध कोणत्याही प्रकारचा फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उमेदवारास मराठी भाषा वाचता व लिहता येणे बंधनकारक आहे.

५) थेटमुलाखतीसाठी येणाऱ्या उमेदवारांना कोणत्याही प्रकारचा प्रवास खर्च किंवा भत्ता दिला जाणार नाही.

६)अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष रित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

७) अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांच्या सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही.

८) आवश्यक पात्रता असलेला अर्जदार न मिळाल्यास त्या पदाकरिता असलेली पात्रता व अर्हता आवश्यकतेनुसार शिथील करण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात आलेले आहेत.

कोणतीही पुर्वसुचना न देता निवड प्रक्रिया बदलण्याचे किंवा रद्द करण्याचे अधिकार जिल्हा स्तरीय निवड समितीने राखुन ठेवलेले आहेत.

स्वाक्षरीत/-

जिल्हा शल्य चिकित्सक